14-03-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 03/13/2025 11:31 PM Page 1



# मोरजीचा समुद्रकिनारा स्विमिंग झोन करू नये

## स्थानिक मच्छिमार नागरिकांचा विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १३ :** सरकारने विठ्ठलदासवाडा – मोरजी समुद्रकिनारी भागात फ्लोटिंग बॉल दोर लावून किनारा स्विमिंग झोन म्हणून जाहीर करून स्थानिक मच्छिमार व्यावसायिकांना अडथळे निर्माण करण्याचा जो प्रकार सुरू केला आहे, तो प्रकार त्वरित थांबवावा. स्विमिंग झोन विभागाला आमचा विरोध असल्याचे विठ्ठलदासवाडा मोरजी येथील स्थानिक मच्छिमार व्यावसायिक बांधवांनी सांगितले. तर आमदार जीत आरोलकर यांनी आपण मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, पर्यटन मंत्री रोहन खंवटे यांच्याकडे चर्चा करून स्विमिंग झोनसाठी जे फ्लोटिंग दोर लावलेले आहेत, ते त्वरित काढावेत, अशी मागणी स्थानिक मच्छिमार व्यावसायिकांनी केली आहे.

विठ्ठलदासवाडा मोरजी समुद्रकिनारी अचानक पर्यटन खात्याने स्थानिक पंचायत स्थानिक आमदार स्थानिक नागरिक स्थानिक मच्छिमार व्यावसायिक यांना कोणतीच पूर्वकल्पना न देता या ठिकाणी स्विमिंग झोन जाहीर करत असताना त्या ठिकाणी स्विमिंग फ्लोटिंग बॉल दोर लावून जागा आरक्षित केली आहे. त्याच परिसरात पर्यटकांनी नागरिकांनी पोहण्यासाठी जावे, अशा सूचना जीवरक्षक पर्यटकांना देत आहेत. त्यामुळे स्थानिक मच्छीमार व्यावसायिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हा परिसर पोहोण्यासाठी सुरक्षित आहे. शिवाय मच्छीमारी करण्यासाठी हा परिसर चांगला आहे. त्यामुळे सरकारने फ्लोटिंग बॉल दोरी टाकून जागा आरक्षित करण्यापेक्षा काही काळासाठी त्या ठिकाणी स्विमिंग करण्यास हरकत नसल्याचे स्थानिक मच्छीमार व्यवसायिकांनी सांगितले. परंतु कायमस्वरूपी जर त्या ठिकाणी फ्लोटिंग बॉल दोर घालून ठेवली. तर पहाटे जाता येता होड्यांना जाळे फेकताना खूप त्रास होऊ शकतो, याची जाणीव सरकारने ठेवावी. या ठिकाणी स्विमिंग झोन करत असताना अगोदर स्थानिक मच्छिमार व्यावसायिकांचे प्रश्न, त्यांच्या समस्या सोडवण्यावर भर द्यावा, अशी मागणी स्थानिक युवक अल्बर्ट फर्नांडिस यांनी केली आहे.

आमदार आरोलकर यांना याविषयी विचारले असता आपण मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, पर्यटनमंत्री रोहन खंवटे यांच्याकडे चर्चा केली असून या ठिकाणी स्विमिंग झोनसाठी ज्या पद्धतीने फ्लोटिंग बॉल घातलेले आहेत, ते फ्लोटिंग बॉल जीवरक्षकाने टाकले असून ते फ्लोटिंग बॉल त्वरित काढण्यात येतील. त्यासाठी आपण सरकारकडे चर्चा केल्याचे आमदार आरोलकर यांनी सांगून या एक–दोन दिवसात ते फ्लोटिंग दोर काढण्यात येईल. असे आमदार आरोलकर म्हणाले.

दरम्यान स्थानिक पंच विलास मोरजे यांनी स्थानिक मच्छिमार व्यावसायिकांचे प्रश्न, त्यांची समस्या लक्षात घेऊन पंचायतीमार्फत ठराव मंजूर करून या ठिकाणी स्विमिंग झोनला विरोध असल्याचे सांगितले. याठिकाणी शूटिंग बॉल रोप घालण्यापेक्षा काही काळासाठी स्विमिंग झोन म्हणून जाहीर केला तर हरकत नाही. परंतु मच्छीमार व्यवसायिकांना त्याचा त्रास होणार नाही, यासाठी सरकारने अगोदर या सर्व स्थानिक व्यावसायिकांना विश्वासात घेऊन पुढील कृती करावी. तोपर्यंत स्विंमिग झोन जाहीर न करता तो रद्द करावा, अशी मागणी करणारा ठराव आणि निवेदन विलास मोरजे यांनी मुख्यमंत्री, पर्यटनमंत्री खंवटे, मच्छिमार व्यावसायिक मंत्री हळदणकर व संबंधित खात्याला सादर केले आहे.



मोरजी ; मोरजी विठ्ठलदासवाडा समुद्रकिनारी स्विमिंग झोन केलेल्या परिसरात फ्लोटिंग बॉल दोरी घातलेली. दुसऱ्या छायाचित्रात स्थानिक मच्छीमार.

## पान १ वरून

### कलम १७(२) रद्द : उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

आहे. काही प्रकरणांमध्ये शेतीची जमीन, वनक्षेत्र आणि बांधकाम निषिद्ध झोन सेटलमेंट झोनमध्ये रूपांतरित करण्यात आल्याचे आढळून आले. न्यायालयाच्या निर्णयानुसार आता कलम १७ (२) अंतर्गत कोणतीही नवीन मंजुरी दिली जाणार नाही. प्रादेशिक योजनेच्या चौकटीतच प्रस्तावांचे मूल्यांकन होणार आहे. यामुळे झोनिंग बदलांचे मनमानी रूपांतरण थांबवले जाणार आहे. या निर्णयामुळे गोवा सरकारला मोठा धक्का बसला आहे. राज्य सरकारने आदेशाची अंमलबजावणी सहा आठवड्यांसाठी स्थगित करण्याची मागणी केली होती. मात्र, न्यायालयाने ती फेटाळून लावत, पुढील कोणतीही परवानगी तत्काळ रद्द केल्या आहेत.

-------------

### पोळजी यांच्या आक्षेपार्ह विधानांवर एफआयआर

शोधमोहीम राबवली असली तरी काणकोणकर यांचा ठावठिकाणा अद्याप सापडलेला नाही. काणकोणकर यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याविरोधातही आक्षेपार्ह विधाने केल्यामुळे त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यांना अटक केल्यानंतर न्यायालयाने जामिनावर मुक्त केले होते.

पोलिसांनी रात्री काणकोणकर यांच्या घरी धाड टाकली असता ते तेथे हजर नव्हते. त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा ठावठिकाणा माहीत नसल्याचे सांगितले. तसेच काणकोणकर यांनी आपला मोबाईल घरीच ठेवल्यामुळे त्यांचे लोकेशन मिळण्यात अडचणी येत असल्याचे पोलिसांनी सांगितले.




हरमल : प्राप्ती महिला फेडरेशनचे महिला दिनाचे उद्‌घाटन करताना माजी सरपंच तथा विद्यमान पंच प्रशांत (बाळा) नाईक. सोबत अधिकारी दीपक देसाई, डॉ. प्रमोद साळगावकर, उपसरपंच सोनाली माज्जी, पंच अनुपमा मयेकर, नारायण रेडकर व अन्य.

# महिलांनी समाजात स्वत:चे स्थान निर्माण करण्याची गरज

▶ **डॉ प्रमोद साळगावकर : हरमलात प्राप्ती महिला दिन साजरा**

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १३ :** सध्याच्या जगात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून वावरतात तसेच संस्कारित कुटुंब घडविण्यात मोठे योगदान देत असते. सद्यस्थितीत पुरुषांनी मानसिकता बदलणे आवश्यक असून बरोबरीने संसार कार्य करणे गरजेचे आहे. त्यासाठी महिलांनी स्वातंत्र्याचा दुरुपयोग न करता, धीटपणे समाजात वावरले पाहिजे व स्वतःचे स्थान निर्माण केले पाहिजे, असे प्रतिपादन महिला उद्योजिका तथा जिनो फार्मास्युटीकलच्या संचालिका डॉ. प्रमोद साळगावकर यांनी केले.

हरमल येथील प्राप्ती महिला फेडरेशन आयोजित महिला दिन सोहळ्यात प्रमुख पाहुणे नात्याने त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर हरमलच्या उपसरपंच सोनाली माज्जी, पंच अनुपमा मयेकर, फेडरेशनच्या उपाध्यक्ष स्नेहा कान्होजी, सचिव विनिता मांद्रेकर, खजिनदार मिलन कोरकणकर, सिस्टर ग्रेसी, सिस्टर एथेल डिसिल्वा आदी उपस्थित होते.

पंच प्रशांत नाईक म्हणाले की, जगात महिला दिन ८ मार्चला साजरा केला जातो. खरे म्हणजे महिलांचा सन्मान केवळ एक दिवस न करता, वर्षभर करणे गरजेचे आहे. महिला चूल व मूल ह्यात अडकून पडल्या नाहीत, हे सिद्ध झाले. पुरुषांच्या तुलनेत महिला सरस आहेत. त्यामुळे प्रत्येक दिवस त्यांचा आदर, सन्मान करणे योग्य आहे. प्रत्येक क्षेत्रात महिला पुढे आहेत. संसारात मुलगी, पत्नी, सून, आई, बहिण अशा अनेक नात्यात महिलांनी आपली भूमिका व्यवस्थित निभावली आहे. प्राप्तीचे नारायण रेडकर यांनी राजकारण बाजूला सारून समाजकार्य चालू ठेवले पाहिजे. सरकारी अधिकारी दीपक देसाई यांनी महिला बाल कल्याण खात्यात असताना, खूप सहकार्य केले आहे. त्यांच्यासारखे अधिकारी मिळणे कठीण आहे. प्राप्ती फेडरेशनला आपले नेहमीच सहकार्य असेल.

अतिरिक्त संचालक दीपक देसाई यांनी प्राप्ती फेडरेशनच्या कार्याचे कौतुक केले व समाजातील महिलांसाठी सरकारी योजनांचा लाभ देऊन सशक्तीकरण करण्याचे आवाहन केले.प्राप्ती फेडरेशनद्वारे महिलांच्या उन्नतीसाठी सदोदित, आपले सहकार्य असेल, असे सांगितले.

प्रारंभी हरमल पंचक्रोशी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. त्यांना दशरथ नाईक, रोहन कदम व जिग्नेश पेडणेकर यांनी संगीतसाथ केली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सोहळ्याचे उद्घाटन केले.

फेडरेशनच्या रीमा हर्जी, करिश्मा ठाकूर,भारती नाईक,राजलक्ष्मी वस्त, सुनीता नाईक,राखी कोरकणकर आदींनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सूत्रनिवेदन समीरा साळगावकर यांनी केले .यावेळी ५०० पेक्षा जास्त महिला उपस्थित होत्या. यानंतर सर्व गटाच्या महिलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

# पार्से चोरीतील चोरट्याकडून साडेआठ लाखाचे दागिने जप्त



मांद्रे : मांद्रे पोलिसांनी जप्त केलेले दागिने व पोलिस.

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १३ :** पार्से येथील अमिता नाईक यांच्या घरातील साडेआठ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरल्याप्रकरणी विजय शिंदे व भीमराव शिंदे या सोलापूर येथील संशयितांना मांद्रे पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून साडेआठ लाखांचे दागिने जप्त केले.

चोनसाई पार्से येथील अमिता नाईक यांच्या निवासस्थानी ११ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेआठ वाजता काही साधू ब्राह्मण बनून दोन संशयित घराकडे आले आणि आपण देवदूत असल्याचा दावा करत घरात विधी करण्याची विनंती केली. अमिता नाईक यांनी श्रद्धेच्या भावनेतून विधी करण्यास सुरुवातही केली. भीमराव शिंदे व विजय शिंदे या दोघांकडून विधी करण्यास सुरुवात झाली. त्यानंतर संशयितांनी तुमच्याकडे जेवढे दागिने असतील ते काही काळ देवाला अर्पण करूया आणि ते दागिने परत करूया, असे तिला सांगितले. तिने श्रद्धा ठेवून दागिने त्यांच्या हवाली केले. काही क्षणातच सर्व दागिने घेऊन तिथून त्या दोघांनीही पळ काढला. यानंतर अमिता नाईक यांनी मांद्रे पोलिसांकडे ११ फेब्रुवारी रोजी तक्रार नोंदवली. त्या तक्रारीच्या आधारे मांद्रे पोलिस निरीक्षक शेरीफ जेकिस यांच्या नेतृत्वाखाली पोलिस टीमने कोळेगाव मोहोळ रेल्वे स्टेशन सोलापूर या ठिकाणी दोन्ही संशयितांना मुद्देमालासहित ताब्यात घेतले आणि त्यांना अटक केली. सदर संशयित आणि कोणत्या गुन्ह्यात सामील आहेत का? याचा तपास मांद्रे पोलीस करीत आहेत. मांद्रे पोलिसांनी भारतीय दंड संहिता कलम ३१८ (२) ३१६(२) या कलमाखाली गुन्हा नोंदवण्यात आला व त्यांना अटक केली.



ब्रह्मकरमळी: येथील महिला दिन कार्यक्रमात बोलताना ॲड. शिवाजी देसाई आणि उपस्थित महिला वर्ग

# जिजामातेच्या आदर्शातून संस्कारक्षम पिढी निर्माण करा : ॲड. देसाई

■ टीम दैनिक हेराल्ड

**वाळपई, दि. १३ :** प्रत्येक स्त्री मध्ये प्रचंड शक्ती आहे. ही शक्ती सकारात्मक विचारातून जागृत होणे आवश्यक असते. जिजामातेने सकारात्मक विचारातून स्वतःमधील शक्ती निर्माण केली आणि छत्रपती शिवरायांसारखे सुपुत्र घडविले. प्रत्येक स्त्रीने जिजामातेच्या आदर्शातून आपल्या मुलावरती संस्कार करायला हवेत आणि संस्कारक्षम पिढी निर्माण करायला हवी, असे प्रतिपादन शिवव्याख्याते ॲड. शिवाजी देसाई यांनी केले.

ब्रह्माकरमळी सत्तरी येथील श्री ब्रह्मदेव देवस्थान सभागृहात महिला दिनानिमित्त वैश्य सेवा मातृ मंडळ दुर्गा भट फोंडा यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते या नात्याने ते बोलत होते. याप्रसंगी वैश्य सेवा मातृ मंडळ दुर्गा भट फोंडाच्या अध्यक्ष माया सराफ, गीता वारकर आदी मान्यवर उपस्थित होते.

ॲड. देसाई म्हणाले की, आजच्या २१ व्या शतकात महिला सक्षमपणे पुढे येत आहेत. जसे एका पुरुषाच्या मागे स्त्री असल्याशिवाय पुरुषाला यश येत नाही तसेच स्त्रीच्या मागे खंबीरपणे पुरुषांनी देखील उभे राहणे तेवढेच आवश्यक असते. स्त्रियांनी स्वतःला कमजोर समजता कामा नये. असंख्य स्त्रियांनी मोठ–मोठ्या इतिहासाची निर्मिती केली आहे. एक सुशिक्षित आणि सकारात्मक स्त्री ही एका उत्तम कुटुंबाची निर्मिती करत असते. आणि उत्तम कुटुंबाच्या माध्यमातून सर्वोत्तम राष्ट्र बनते हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

ॲड. देसाई यांनी सांगितले की, स्त्रियांनी मुलांकडे लक्ष मूल जेव्हा त्यांच्या पोटात वाढायला लागते तेव्हापासून द्यायला पाहिजे. ही आजच्या समाजाची फार मोठी आवश्यकता आहे. कारण आज विचित्र पद्धतीचे विचार अनेक ठिकाणी पसरत आहेत. आणि या विचित्र पद्धतींच्या विचारांचा प्रभाव पोटात वाढणाऱ्या मुलावरती होत असतो हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. नको त्या चुकीच्या गोष्टींपासून तसेच वायफळ चर्चेपासून दूर राहिले पाहिजे. प्रास्ताविक माया सराफ यांनी केले तर गीता वारकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद लाभला.

# साखळीत 'कॉपीराइट कायद्याचे परिणाम आणि उपयोग' वर कार्यशाळा

## इंग्रजी विभागातर्फे आयोजन | मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि.१३ :** येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालयातील इंग्रजी पदव्युत्तर विभागाच्या वतीने बीए भाग ३ (इंग्रजी) आणि एम.ए. (इंग्रजी) च्या विद्यार्थ्यांसाठी परिषद सभागृहात कॉपीराइट कायद्याचे परिणाम आणि उपयोग या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या सत्राचे संचालन गोवा येथील पणजी येथील व्ही.एम. साळगावकर कॉलेज ऑफ लॉच्या कायद्याच्या सहायक प्राध्यापिका डॉ. श्रुती कामत दलाल आणि प्रॅक्टिसिंग वकील ॲड. उज्वला पेडणेकर यांनी केले. या सत्राच्या समन्वयक डॉ. अंबिका कामत होत्या. त्यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला व आभार मानले. यावेळी उपप्राचार्य इंग्रजी पदव्युत्तर विभागाचे समन्वयक शरत जमकंडी, इंग्रजी विभागाच्या प्रमुख अनिता जेकब, सहायक प्राध्यापिका अलिशा सूझा आणि प्रा.बकिता नाईक. एमए (इंग्रजी) भाग दोनची विद्यार्थिनी राहेल कुतिन्हो आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. श्रुती कामत दलाल यांनी कॉपीराइटच्या अर्थावर प्रकाश टाकला, जो लेखकाचा एक कायदेशीर अधिकार आहे. बौद्धिक संपदा अधिकारांचे संरक्षण करणे आवश्यक आहे, असेही त्या म्हणाल्या. बौद्धिक संपदा हक्कांचे उल्लंघन केल्याबद्दल जास्तीत जास्त दंड किंवा तुरुंगवास या शिक्षांविषयीही त्यांनी सांगितले. डॉ. श्रुती यांनी कॉपीराइट कायद्याच्या कलम ५१ च्या संदर्भात कॉपीराइटचे गांभीर्य आणि त्याचा वापर अधोरेखित करण्यासाठी अनेक प्रकरणांमधून उदाहरणे देखील दिली. ॲड. उज्वला पेडणेकर यांनी साहित्यिक चोरीच्या समस्यांवर प्रकाश टाकला आणि कॉपीराइट उल्लंघनाचा मुद्दा स्पष्ट केला. शैक्षणिक आणि संशोधन प्रकाशनांमध्ये कोणतेही उल्लंघन आढळल्यास कोणती शिक्षा आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. तसेच कलाकारांच्या अधिकारांवरही प्रकाश टाकला. कलाकारांच्या हक्कांमध्ये श्रेय मिळण्याचा अधिकार, अनधिकृत प्रसारण रोखण्याचा अधिकार आणि रॉयल्टीचा अधिकार यांचा समावेश होतो, असे त्यांनी सांगितले.



बसाखळी : मान्यवर तज्ज्ञांसोबत उपप्राचार्य शरत जमकंडी, सत्राच्या समन्वयक डॉ. अंबिका कामत व सहभागी विद्यार्थी.


**GOVERNMENT OF GOA**
**OFFICE OF THE ASSTT. REGISTRAR OF COOPERATIVE SOCIETIES, ARBITRATION/EXECUTION, NORTH GOA DISTRICT,**
At "Sahakar Bhavan", 1st Floor, Curti, Ponda Goa.

ABN Case No.:-ARCS/VPK/GOA VELHA/2023/ABN/2017

VPK Urban Co-operative Credit Society Ltd. Goa Velha Branch, Goa Velha Tiswadi- Goa. ........Disputant

V/s

1. Mrs. Deepa Viraj Naik: H.No.238, Mahalwada Madkai Ponda Goa.
2.Mr.Sukan Vassant Naik :Qtrs. No. B-19,Electricity Dept. Colony Curti Ponda Goa.
3.Mr.Vijesh Shrikant Naik :H.No.368 Tamsoda Dharbandora Ponda Goa.

.......Opponents

(Summons under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908)

To,
The Opponent No. 2

WHEREAS, the above mentioned disputant society has instituted a dispute against you, Opponents for recovery of dues, in terms of section 83 of the Goa Co-operative Societies Act, 2001.

AND WHEREAS the disputant has claimed a sum of Rs. 278359.30 (Rupees Two Lakh Seventy Eight Thousand Three Hundred Fifty Nine and paise Thirty Only with accrued interest thereon and cost.

AND WHEREAS, the proceedings has been initiated into the same and the summons/notice issued to you at your last known address returned unserved with postal remarks "Party Left/Addressee Left returned to sender".

AND WHEREAS, the disputant vide application dated 19.02.2025 prayed to publish the notice on local newspaper as substitute service as required under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908.

AND WHEREAS the court is satisfied that this is fit case for ordering substitute service by publication of notice on local newspaper.

NOW THEREFORE, the above opponents hereby summoned by this notice to appear before me in person on **10.04.2025 at 03.00 p.m.** and to produce on that day all the documents upon which they intend to rely in support of their defense.

TAKE NOTE that in default of your appearance on the date and the time as stipulated above, the matter will be heard and determined in your absence.

Given under my hand & seal of this office on this 13th day of March 2025.

SEAL

Place:Ponda
Date: 13.03.2025

Sd/- **(Harischandra S. Gawde)**
Asstt. Registrar of Co-op Societies
ABN/EXE North Goa District Curti Ponda- Goa.



Email : cbicourt-ngdc.goa@nic.in
Phone: 2264250/2264251
DJ-2/MAP/Civil/EXA 77/2021/2025/ 595
Dated : 12.03.2025
To be publish on Local Daily Newspaper (U/o V r. 20 CPC)

IN THE COURT OF DISTRICT JUDGE-2, RAJ RAUNAK BUILDING, MAPUSA (Before Shri. Ram S. Prabhudessai, District Judge-2 Mapusa)

**Execution Application No. 77 / 2021**

The Lokmanya Multipurpose Co-operative Society (Multi-state) ....Decree Holder

V/s

Smt. Shakuntala Ashok Rathod & 3 Ors. .... Judgment Debtors

**NOTICE**

To, **The Judgment Debtor No.**
1. Smt. Shakuntala Ashok Rathod (Mem No. (4) 85599) Major of age, R/o No.45/B, Sinquerim wado, Candolim, Bardez Goa. (B) Readymade Garment Shop, Aradi, Candolim, Bardez Goa.

WHEREAS, the above named Decree - Holder have instituted a Execution Application against you.

AND WHEREAS, notices have been issued to you returned unserved with the endorsement that whereabouts are not known.

AND WHEREAS, Adv. Ms. A. Bhamaikar holding for Adv. Ms. N. Shivolkar, advocate for the Decree-Holder have filed an application in this Court praying that you be served by Substituted service by publication in the Daily Newspaper circulating in the locality on which the said JD No. 1 was last known to have actually and voluntarily resided.

AND WHEREAS, this Court is satisfied that this is a fit case for ordering such a service.

NOW, therefore, notice is hereby given to you under order V Rule 20 (A) of C.P.C. to appear before the Court of District Judge-2 & Addl. Sessions Judge, Mapusa, Raj Raunak Bldg. Shetye Waddo, Duler Mapusa either in person or by a pleader duly instructed, if any on **9th day of April, 2025 at 10.00 a.m.**

TAKE FURTHER, notice that in default of your appearance on the day and time aforementioned, the matter will be heard and determined in your absence.

GIVEN under my hand and the Seal of the Court, this 12th day of the Month of March, 2025.

SEAL

**Sd/- (Ram S. Prabhudessai)**
**District Judge-2 & Addl. Sessions Judge, Mapusa**



**IN THE COURT OF MAMLATDAR OF PERNEM TALUKA PERNEM GOA**

**Case No. MAM / PER / TNC / PUR / 03 / 2023**

Anand Barde, R/o Zunaswada, Mandrem, Pernem, Goa ....Applicant

**V/S**

1. Raghunath Ghanashyam Mandrekar 2. Shivaji Narayan Mandrekar 3. Shreedhar Bhikaji Mandrekar 4. Atchut Bhikaji Mandrekar 5. Dinkar Bhikaji Mandrekar 6. Mahadev Bhijkaji Mandrekar 7. Rajaram Parshuram Mandrekar 8. Gurunath Parshuram Mandrekar, All R/o Mandrem, Pernem, Goa ..... Opponents

To, The Opponents

**NOTICE UNDER ORDER V RULE 20(1A) of CPC 1908**

Whereas in the above case Judgment and Order was passed on 23.11.2023 fixing the purchase price of the suit property surveyed under survey no. 279/2 of Village Mandrem admeasuring an area of 2915 sq. mtrs, fixing the purchase described in the schedule as per the rate laid down in the table prescribed u/s 18(C) of Goa Daman and Diu Agricultural Tenancy Act, 1964.

And whereas the notices were sent to the opponents by register A.D. has been returned by the postal authorities with remarks "Insufficient address."

And whereas the applicant vide his application dated 20/02/2025 has stated that the applicant is not aware about any other address of his legal heirs/ unknown legal heirs, therefore they prayed to serve the above opponents by way of substitute service by publishing notice in the daily newspaper.

And whereas after considering the request of the applicant, I have come to the conclusion that this is a fit case for publishing the notice in any local newspaper.

Therefore notice is hereby given under order 20(1-A) to you to appear in this court on **19/03/2025 at 10.30. a.m.** in person or through duly authorized agent failing which ex-parte order shall be passed and the matter shall be decided in your absence.

Given under my hand and seal of this Court on this 21st day of February 2025.

Sd/- **Ranjeet R. Salgaonkar**
Mamlatdar of Pernem Taluka
Pernem, Goa

Seal



**CHANGE OF NAME**

I undersigned **LIBERATA MARGARIDA COSTA** Resident of House no 147 /B, Piedade waddo Cansaulim ,south Goa 403712 wants to change my name from **LIBERATA MARGARIDA PEREIRA** to **LIBERATA MARGARIDA COSTA.** Hereinafter I will be known as Liberata Margarida Costa in all my dealings and documents.

Sd/-**Liberata Margarida Costa**



**NOTICE**

My Husband **Late Sashindran Vadakkedath** was owning **Honda Activa SCV110D** bearing **Reg. No. GA-06-J-4980.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Sd/-
**Padmini Puthiyandi**
**H.No. 88, Fondiem, Chicolna, Bogmalo, South Goa 403806**
**Date: 13.03.2025**

Sandeep Ads



**BEFORE THE MAMLATDAR OF MORMUGAO TALUKA AT VASCO DA GAMA, GOA.**

**Mutation Cases No. 411998/VASCO/2025**

1. Michael Henriques,
2. Evette Henriqueta Henriques and
3. Vilma Henriques,
R/o.171 A, Mangor, Vasco da Gama, Goa. ...Applicant

**V/s**

1. Nicael Cyril Henriques, 2.William Cardozo, 3. John Henriques, 4. Igato Protasio Henriques, 5. Luiza Damiana Henriques, 6. Maria Felicidade Dsilva Henriques, 7. Elsa Maria Santo Antonio De Sousa Henriques. ...Opponents

**PUBLIC NOTICE**

To, all the Opponents/Legal heirs/any other interested parties.

The applicants Michael Henriques, Evette Henriqueta Henriques and Vilma Henriques, R/o.171 A, Mangor, Vasco da Gama, Goa, **requested to include their names as Holders of the property surveyed under P.T. Sheet No.149 of Chalta Nos. 89 of Vasco city of Mormugao Taluka** by virtue of Family Partition Deed under Reg. No.654 at pages 202 to 225 of Book No.I, Volume No.357 dated 24/07/2002.

And whereas notices in Form No. G (See rule 14) sent to the co-owners/ interested parties by registered A. D. post were returned unserved by the Postal Authorities with their remarks,"Insufficient Addresses/ Not Known/Left/Expired/ Unclaimed return to sender" or not return back.

And whereas the applicants vide his application dated 07/02/2025 along with Affidavit dated 03/02/2025, has requested the unserved co-owners/interested parties, if any be served by substitute service by way of publication of notice in the local daily newspaper.

And whereas, I am satisfied this is a fit case for ordering such service.

Now therefor notice is hereby given to the above mentioned parties under Order-V, Rule 20(1) A of Civil Procedure Code and they are hereby called upon to file their claims, objections, if any, before me in person or through their duly authorized agents **within 15 days** from the said publication of notice.

Take note that incase the claims and objections are not received by me as aforesaid. It will presumed that you have no objections to the mutation and the same shall be finalized in your absence.

Place :Vasco da Gama.
Date :10/02/2025

Sd/-
**( Pravinjay Pandit)**
Mamlatdar of Mormugao Taluka,
Vasco da Gama, Goa.

Seal

Sandeep Ads



**BEFORE THE JOINT MAMLATDAR IV OF BARDEZ TALUKA, MAPUSA, BARDEZ, GOA**

**Mutation Case No: 96847 Village: Socorro**

1. Vishwambar Gurudas Kasuthankar 2. Vishwari Vishwambar Kauthankar 3. Pradeep Gurudas Kauthankar 4. Pramila Pradeep Kauthankar 5. Chandrashekhar Gurudas Kauthankar 6. Vidhi Vishwajit Kauthankar 7. Vishwajit Gurudas Kauthankar, all r/o Zos Waddo, Ambeval, Socorro, Bardez, Goa .....Applicant

V/s

1. Aarvi Rupesh Varkhandkar 2. Pushpavati Gurudas Kauthankar 3. Rupesh Kamlakant Varkhandkar 4. Gurudas Ladu alias Zila Kawthankar ....Opponents

**PUBLIC NOTICE**

To all Opponents / Legal Heirs / any other interested parties

Whereas the applicants Vishwambar Gurudas Kasuthankar, Vishwari Vishwambar Kauthankar, Pradeep Gurudas Kauthankar, Pramila Pradeep Kauthankar, Chandrashekhar Gurudas Kauthankar, Vidhi Vishwajit Kauthankar, Vishwajit Gurudas Kauthankar, all r/o Zos Waddo, Ambeval, Socorro, Bardez, Goa has applied for mutation under section 96 of L.R.C. 1968 to include their names in occupants column under Sy. No. 261/1-A of Village Socorro, Taluka Bardez after deleting the existing name of Gurudas Ladu alias Zila Kawthankar from occupants column as per Inventory Proceedings No. 375/2023/G passed in the Court of the Civil Judge Junior Division G Court at Mapusa.

And whereas, the notices in Form no. X were served to all the interested parties by registered A/D. However some A.D. card returned back with the postal remarks "Party Expired / Party Left / Not Known / Address out of Station" and he do not know the detailed addresses of the Legal Heirs and whereabouts of the interested parties.

And whereas, the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.

Mapusa, Dated: 14/12/2022

Sd/- **Dayle Rebello**
Joint Mamlatdar IV of Bardez, Mapusa, Goa

Seal



**VILLAGE PANCHAYAT PARCEM, PERNEM – GOA.**

Ref.No.VP/PARCEM/PER/Quot. Notice/2024-2025/ 958 Date:11/03/2025

**QUOTATION NOTICE**

The Sarpanch of this Village Panchayat Parcem, Pernem Goa on behalf of V.P.Parcem, Pernem Goa invites the sealed Quotations from the interested suppliers, so as to reach in this office on or before **29/03/2025 upto 10.30 a.m.** for supply in respects of supplying Stationary and Printed Registers for the Year 2025-2026 and following items/Goods including GST.

| ITEM NO. | DESCRIPTION | QTY. |
|---|---|---|
| 1 | Exide Invertor 1450 KV - 1 No. & Battery 150AH - 2 Nos with including fitting charges with box | 1 |
| 2 | Green Chalk Board | 5 |
| 3 | Cupboard | 5 |
| 4 | Kisan kraft Water Pump (1.5 HP) | 2 |
| 5 | Kisan Kraft Grass Cutter | 2 |
| 6 | Power Tex Tree Cutter | 1 |
| 7 | Sports Material | Each Item |
| 8 | Stationary | Each Item |
| 9 | Printed Register Forms | Each Item |

**1.** Dealers should submit their sealed quotations on or before **29/03/2025 upto 10.30 a.m.** to this Panchayat & the opening of same will be done on **29/03/2025 at 10.45 a.m.** onwards. The lowest quotation will be accepted. **2.** Payments shall be made through XV FC/egramswaraj Portal/PF after the delivery of the goods in good condition at Village Panchayat Parcem. **3.** The rate shall be quoted per item and should be inclusive of all taxes with door delivery. **4.** The Village Panchayat Parcem reserves the right to accepting or rejecting any or all quotation without assigning any reason their off. **5.** For complete description, specification, details etc. contact V. P. Parcem.

Seal

Sd/- (Ajay S. Kalangutkar) Sarpanch, V. P. Parcem, Pernem – Goa.